भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.३१३/माहिती कक्ष/वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा

दिनांक ०५/०५/२०१७

**१) शेतावरील पाण्याचा इंजीन व साहित्याची चोरी . :–**

दिनांक २४/०४/२०१७ ते २५/०४/२०१७ दरम्यान यातील फिर्यादी घनश्याम गंगराम बोन्द्रे वय ५१ वर्ष, रा. हनुमान वार्ड वरठी हा आपले शेतावरील होंडा कंपनीचा पाण्याचा इंजीन, फुटबॉल पाईप व बेड असा एकुण २५,०००/–रु. चा माल चोरीस गेल्याने फिर्यादीने त्याचे शेतावरील विहीरीचे काम करणारे ठेकेदार व मंजुर यांचेवर चोरी केल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) तलावाचे पाण्यात बुडुन मुलाचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०५/२०१७ चे १५.३० वा. ते ४/०५/२०१७ चे ०७.३० वा दरम्यान यातील मृतक वैभव भोजराम वनवे वय १४ वर्ष, रा. सिल्ली हा आपले घरचे जनावरे घेवुन सिल्ली गावाजवळील तलावाकडे गेला व गायीचे शेपुट धरुन तलावाचे पाण्यात गेला असता त्याचे हातातुन गायीचे शेपुट सुटल्याने तो तलावाचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी राजेश तेजराम वनवे वय ३५ वर्ष, रा. सावरी जवाहनगर ह. मु. सिल्ली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) ९० टक्के जळाल्याने महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक २३/०४/२०१७ चे रात्री १०.०० वा दरम्यान यातील मृतक सौ. अर्चना विनोद हुमने वय ३६ वर्ष, रा. गणेशपुर भंडारा हिचे पतीने दारुचे नशेत मुलीला का मारले याकारणावरुन रात्री झोपेतुन उठुन घरी ठेवलेले मातीचे तेल स्वताचे अंगावर ओतुन आग लावली त्यामुळे ती ९० टक्के जळाल्याने तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी तोडासे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोंडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे

**४) गंजातील गरम पाणी अंगावर पडल्याने महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०४/०५/२०१७ चे रात्री ०१.०० वा दरम्यान यातील मृतक सौ. मंदा पांडुरंग उके वय ५० वर्ष, रा. इंदीरा गांधी वार्ड भंडारा ही नितीन धकाते याचे घरी लग्नाचे कार्यक्रम असल्याने स्वयपाक करण्याकरीता मंजुरीने गेली असता स्वयंपाक करीत असतांनी गंजातील गरम पाणी अंगावर पडुन जळाल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे याचे रिपोर्ट व डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.